**नि.फौ.ख.क्र.४८५/२०२३**

निशाणी क्र.१३

# दोषारोप

मी, **एस. ए. विराणी,** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे खालीलप्रमाणे तुमचेवर दोषारोप ठेवत आहेः-

**अरुण दादासो जाधव,**
वय – ३६ वर्षे, व्यवसाय – शेती
राहणार – राजेगांव, ता. दौंड, जि. पुणे.

पहिले असे की, दिनांक ०२.०४.२०२३ रोजी ५.०० वाजेच्या सुमारास मौजे खैरबगाडे वस्ती, राजेगाव ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत फिर्यादी प्रिती आकाश जाधव यांचे राहते घरासमोर तुम्ही विनाकारण दारु पिऊन येऊन फिर्यादी यांचे पती आकाश संपत जाधव व सासरे संपत शिवराम जाधव यांचे नावाने शिवीगाळ करु लागले. त्यावेळी फिर्यादीची सासू रेखा या त्यांना बोलण्यास गेले असता त्यांना ढकलून दिले व फिर्यादी यांचा डावा हात धरुन घरातून बाहेर खेचून स्वतःच्या अंगावर ओढुन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ३५४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

शेवटी असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी, फिर्यादीचे पती, सासरे व सासू यांना शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभणामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

आणि तुम्हास याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे की, तुमच्या विरुध्द उपरोक्त दोषारोपांवर खटल्याची चौकशी होईल.

(एस.ए.विराणी)

दिनांक – ११.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

**<u>दाखला</u>**

प्रमाणित करण्यात येते की, वरील दोषारोपांमधील मजकुर आरोपीस त्याच्या मातृभाषेतून वाचून व समजावून सांगितला.

**(एस.ए.विराणी)**

दिनांक – ११.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.